॥ ॐ श्री साईराम ॥

# साई ज्ञान मौक्तिके

## भाग १२ – अ

**ॐ ॐ ॐ**

प्रिय मित्रहो, दैवी संवाद पूर्ण करण्यासाठी, सर्वांबरोबर परत एकत्र येण्याचा मला खूप आनंद होत आहे.

**जानेवारी २००२**

जानेवारी २००२ मध्ये घडलेल्या घडामोडींबाबत आपण बोलत आहोत. २००२ च्या वार्षिक क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमानंतर भगवान मुलांशी बोलले आणि त्यांनी माहितीपर सूचना दिल्या. त्या सर्वांकरीता फार महत्त्वाच्या आहेत. भगवानांनी त्यांचा संदेश आपल्या सर्वांपर्यंत पोहाचवण्याकरता ही सुसंधी घेतली. ते काय म्हणाले ''

**'सर्वांनी कमीत कमी बोलण्याची जरुरी'**

पहिला मुद्दा : आपण सर्वांनी खूप कमी बोलणे हे फारच महत्त्वाचे आहे का? बोलताना आपली शक्ती वाया घालवतो, आपण आपली स्मरणशक्ती कमी करत असतो, कधी कधी खोटे बालून सत्याचा विपर्यास करतो. म्हणून आपल्या जीभेकडून होणाऱ्या काही चुका टाळण्याकरता आपण कमी बोलावे असे भगवानांना वाटते.

त्याही पुढे जाऊन ते असं म्हणतात की, चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि वृद्धत्व हेसुद्धा फार बोलण्यामुळे लवकर होते. आपल्या सर्वांना तरुण राहावेसे वाटते म्हणून आपण ही काळजी घेतली पाहिजे.

**'वाईट संगत टाळा'**

दुसरा मुद्दा : भगवान मुलांना म्हणाले, नेहमी A–B–C लक्षात ठेवा. याचा अर्थ काय 'AVOID BAD COMPANY' म्हणजे वाईट संगत टाळा.

**'तुमची संगत मला सांगा, मी तुम्हाला तुम्ही कोण आहात ते सांगेन.'**

''म्हणून तुम्ही तुमची संगत ठेवताना काळजी घ्या. वाईट संगतीपासून दूर पळाले पाहिजे. जशी तुमची संगत असते. तसे तुम्ही बनत जाता. हवेबरोबर वाळूचे कण उडत जातात, तीच वाळू पाण्याबरोबर खाली जात असते. आग ही हिरव्या गवताबरोबर विझून जाते, त्याच आगीची ठिणगी सुक्या गवताच्या संगतीने पसरत जाऊन सारे काही जाळून टाकते. म्हणून तुम्ही फारच काळजीपूर्वक वागलं पाहिजे.'

**'तुम्ही स्व:ला चांगल्या कार्यात गुंतवून घ्या'**

तिसरा मुद्दा :

''तुम्ही नेहेमी चांगली संधी शोधण्याची किंवा चांगली संधी मिळण्याची वाट पाहा. म्हणजे तुम्ही चांगल्या आचरणामध्ये, चांगल्या कार्यामध्ये गुंतून राहाल. या गोष्टींची जीवनामध्ये फार जरूरी आहे. त्यामुळे ह्या गोष्टी तुमचा आध्यात्मिक मार्ग ठरवतात. या चांगल्या सेवाकार्याशिवाय तुम्ही आध्यात्मिक आणि धार्मिक होऊ शकत नाही.''

**'कमीत कमी संबंध जोडणे'**

चौथा मुद्दा : ''कमीत कमी संबंध ठेवणे हे अधिक चांगलं. जास्त संबंध वाढवले तर तुम्ही अधिकाधिक समाजाभिमुख होत जाल आणि त्यामुळे तुमचं मानसिक स्वास्थ्य बिघडेल आणि तुमची विचार करण्याची पद्धतही बदलेल. म्हणून समाजात कमी मिसळल्याने तुम्ही स्वत:शी प्रामाणिक राहाल. स्वत:चा ध्येयवाद जपू शकाल, स्वत:च चारित्र्य जपू शकाल. तुमच्या विचारांमध्ये सातत्य राहील आणि स्वत:च्या निवडलेल्या जीवनमार्गावरून जाऊ शकाल. ह्या सर्व फायद्यांकरता तुम्हाला कमीत कमी संबंध ठेवले पाहिजेत.''

**'कोणाला स्पर्श करू नका.'**

पाचवा मुद्दा : ''तुम्ही जेव्हा इतरांमध्ये मिसळता, त्यांच्यशी बोलता तेव्हा त्यांना स्पर्श करू नका. कारण तुम्ही जेव्हा स्पर्श करता तेव्हा त्यांच्यातील कंपने तुमच्यापर्यंत पोहोचतात. इतर लोकांची कंपने तुमच्यापर्यंत पोहोचतील. इतर व्यक्तींचा सतत स्पर्श झाल्याने स्वाभाविकपणेच तुमचे लक्ष विचलित होईल.''

**'एकटे असतानाच ध्यानधारणा शक्य असते.'**

मुद्दा साहावा : भगवानांनी हे अगदी स्पष्ट केलंय की, जेव्हा तुम्ही कोणाच्याही सान्निध्यात किंवा मेळाव्यात किंवा गटात नसता आणि फक्त एकटेच असता तेव्हाच ध्यानधारणा होऊ शकते. काही लोकांना कुलवंत हॉलमध्येच ध्यान करावेसे वाटते, ते शक्य आहे का? सेवादलातील एक कार्यकर्ता तुम्हाला समोर सरकायला सांगेल, दुसरा कार्यकर्ता तुम्हाला मागे सरकायला सांगेल, तिसरा कार्यकर्ता तुम्हाला एका कोपऱ्यात बसायला सांगेल. अशा त्या परिस्थितीत तुम्ही ध्यानधारणा कशी करू शकाल? म्हणून ध्यानधारणा ही फक्त तुम्ही एकटेच असताना होऊ शकते. तुम्ही स्वत:ला एकटेच ठेवा.

**'देवत्वाची जाणीव'**

मुद्दा सातवा : भगवंतांनी हेही अगदी स्पष्ट केलं आहे की, प्रत्येकाला देवत्वाची जाणीव असायला हवी, जे देवत्व प्रत्येक अणू-रेणूत भरून राहिलेले आहे. देवत्व हे प्रत्येक कणाकणात असते. अशा तऱ्हेची जाणीव असणं हीच खरी देवत्वाची अनुभूती आहे.

**'जाणीवेसाठी मार्ग नाही'**

कोणीतरी भगवानांना विचारलं, स्वामी, सजग असणं किंवा जाणीव असणं इथपर्यंत पोहोचण्याचा मार्ग कोणता? जाणीवेपर्यंत पोचवणारा असा कोणता मार्ग आहे?''

भगवानांनी उत्तर दिले, ''देवत्वाच्या जाणीवेकडे नेणारा असा मार्ग नाही. जाणीवेचा अनुभव घेणं हाच अंतिम मार्ग आहे. त्यासाठी निराळा मार्ग असा नसतो. जर तुम्ही म्हणाल की, हा मार्ग आहे, तर त्यात स्थान, वेळ यांचा समावेश असतो. खरी जाणीव ही वेळ, काळ यांच्या पलीकडे असते. जाणीवेची अनुभूती हेच केंद्रस्थान असते, त्यात स्थल, काळ आणि मार्ग यांचा संबंध नसतो.''

**'प्रत्येक क्रीडा संमेलन असमान्यच असते.'**

प्रत्येक क्रीडा संमेलनानंतर स्वामी विद्यार्थ्यांना जे सांगतात, त्यात मलाही सहभागी व्हायचे आहे. तुम्हाला माहीत आहे की, श्री सत्यसाई शैक्षणिक संस्थेचे वार्षिक क्रीडा आणि सांस्कृतिक संमेलन ह्या जानेवारीत पार पडले. त्यातील संदेश आणि कारण हे एकच असल्याने ही माहिती ११ जानेवारी २००२ प्रमाणेच ११ जानेवारी २००३ करीता लागू होते. भगवान ह्या दोन्ही प्रसंगी विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी बोलले. मला त्यातील काही मुद्द्यांबद्दल तुमच्याबरोबर सहभागी व्हायचे आहे. स्वामींनी जे सांगितले ते असे :-

मुद्दा पहिला : श्री सत्यसाई संस्थांचे क्रीडा आणि सांस्कृतिक संमेलन हे असामान्यच असते. तसेच प्रत्येक क्रीडा संमेलन हे काहीतरी खास असते. तो काही नेहमीचा परिपाठ नसतो किंवा नित्याचाच कार्यक्रम नसतो. नाही! प्रत्येक क्रीडा संमेलन म्हणजे एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम असतो.

**'क्रीडा, संगीत आणि नाट्य'**

मुद्दा दुसरा : सत्यसाई शिक्षण संस्था खेळ, संगीत आणि नाट्य या तीन विषयांवर जास्त महत्त्व देतात. तिथले विद्यार्थी हा तीन विभागांमध्ये चांगल्या रीतीने पूर्ण शिक्षित होतात. जेव्हा विद्यार्थी संगीताच्या कार्यक्रम सादर करतात तेव्हा तो व्यावसायिक दर्जाचाच असतो. ती मुले क्रिडाक्षेत्राही विशेषत्वाने नावजलेली असतात आणि आश्चर्य म्हणजे हीच मुले त्यांच्या शालेय शिक्षणामध्येही 'O' ही विशेष श्रेणी मिळवतात. यांनाच तुम्ही 'सर्वांगिण व्यक्तिमत्त्व विकास' असं म्हणता – जिथे विद्यार्थी क्रीडा, नाट्य आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये आपला उच्च दर्जा दाखवतात.

**'तयारीसाठी फक्त पंधरा दिवस'**

मुद्दा तिसरा : साधारणपणे अशा कार्यक्रमाची तयारी करण्यासाठी लोक भरपूर वेळ खर्च करतात. तुमचा विश्वास बसणार नाही की, येथील विद्यार्थी क्रीडा संमेलनाच्या तयारीसाठी फक्त १५ दिवस घेतात. जर तुम्ही हा कार्यक्रम पाहिलात तर तुमचा

विश्वासही बसणार नाही की, अशा प्रकारचे कार्यक्रम फक्त १५ दिवसांच्या तयारीने सादर केले जातात. खरंच, मला तुमच्याबद्दल सांगता येत नाही, पण मी तरी त्यावर विश्वास ठेवू शकत नाही.

तुम्हाला हेदेखील माहीत आहे की, क्रीडा क्षेत्रातील अशा घडामोडींसाठी खूप पैसा खर्च केला जातो पण इथे मात्र कोणताही खर्च केला जात नाही. एकही पैसा यावर खर्च केला जात नाही – यावर तुमचा विश्वास बसेल? विद्यार्थ्यांच्या वसतीगृहात ज्या वस्तू मिळतील त्यांचाच उपयोग येथील विद्यार्थी करतात. महाविद्यालयात आणि वसतीगृहात ज्या वस्तू किंवा सामान मिळेल त्यांचा उपयोग करून भव्य चित्राकृती (कट आऊट्स) आणि पार्श्वभूमीचे देखावे तयार करतात. त्यासाठी काहीही बाहेरून विकत घेतलेलं नसतं. त्यामुळे कसलाच खर्च येत नाही. इतर संस्थांमध्ये अशा गोष्टींसाठी केलेल्या खर्चाचा हिशोब केला तर तो लाखो रुपयांचा होईल, पण इथे मात्र काहीही खर्च नाही! ही गोष्ट चांगलीच आश्चर्यकारक आहे.